# नैतिकता व्यवस्थापनाचे धोरण

## नैतिकता व्यवस्थापन संघटना

आम्ही एका सर्वांगीण नैतिकता व्यवस्थापन संघटनेची स्थापना आमच्या संपूर्ण कंपनीतील नैतिक वागणुकीला अधोरेखित करण्यासाठी केली आहे. एका सकारात्मक आणि नैतिक कामाचे वातावरणाला चालना देण्यासाठी आमच्या कठोर कार्पोरेट प्रयत्नांचा तो एक महत्त्वाचा घटक आहे.

## नैतिकता पूर्तता प्रक्रिया

आरइन्फ्राची नैतिकता आणि उद्योग धोरणांची संहिता खालील व्यक्तींना लागू होतेः

- व्यवस्थापन श्रेणीतील सर्व अधिकारी आणि
- सर्व पूर्णवेळ सल्लागार, प्रतिनिधी, पुरवठादार, कंत्राटदार आणि एजंट

इतर कर्मचाऱ्यांना संहिता आणि धोरणाची लागू होण्याची योग्यता नंतर तपासली जाईल.

## टप्पा १: संहिता आणि धोरणांचा अंगीकार आणि स्वीकार

सर्व कर्मचाऱ्यांनी संहिता आणि धोरणांचा अंगीकार आणि स्वीकार तात्काळ केला पाहिजे. त्याबाबतीतील होकारार्थी/वचनबद्धता असलेले एक पत्र व्यवस्थापन श्रेणीतील आणि त्यावरील प्रत्येक कर्मचाऱ्याकडून नोंदींवर राखले जाईल. हे एकदाच करायचे आहे.

आचारसंहितेचा आणि धोरणाचा असा स्वीकार नेमणुकीच्या पत्रात अधोरेखित केल्याप्रमाणे रोजगाराच्या अटी आणि शर्तींच्या आपोआप सुधारणेचा भाग म्हणून मानला जाईल.

सदर धोरण/संहिता स्वीकारण्यास कर्मचाऱ्याने नकार दिल्यास त्याला/तिला कामावरून काढले जाईल.

## टप्पा २: प्रकटीकरण

सदर आचारसंहितेअंतर्गत व्याप्त प्रत्येक व्यक्तीने नैतिकता कार्यालयाकडे टप्पा १ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे स्वीकार पत्राच्या तारखेपासून पंधरा दिवसांपेक्षा उशिरा नाही अशा रितीने नैतिकता संहितेची अंमलबजावणी आणि लागू करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती द्यावी. ही देखील एकदाच करण्याची गोष्ट आहे.

## टप्पा ३: वार्षिक अहवाल

सदर संहितेअंतर्गत व्याप्त प्रत्येक व्यक्ती नैतिकता कार्यालयाकडे १ जानेवारीपूर्वी खालील गोष्टी सादर करेलः

- मागील वर्षभरात नैतिकता संहिता आणि उद्योग धोरणांच्या वैयक्तिक पूर्तता केल्याची माहिती.

- नैतिकता संहितेत स्पष्ट केल्याप्रमाणे त्याचे सर्व हितसंबंधांचे संघर्ष नोंदवलेला जबाब आणि तो नसल्यास त्याबाबतीतील जबाब.
- नैतिकता पूर्ततेबाबत पूर्णपणे भरलेली प्रश्नावली आणि
- पूर्णपणे भरलेला माहिती प्रकटीकरण अर्ज

**टप्पा ४: पूर्तता आढावा प्रक्रिया**

नैतिकता पूर्तता प्रक्रियेत खालील बाबींचा समावेश आहेः

१. कर्मचाऱ्यांना स्वनियमन करून हितसंबंधांचे सर्व संघर्ष आणि धोरणांच्या उल्लंघनांचे प्रश्न सोडवण्यासाठी आवाहन केले जात आहे.

२. नैतिकता कार्यालय प्रकटीकरण आणि वार्षिक अहवाल प्रक्रियेतून गोळा केलेली सर्व माहिती वापरेल आणि आवश्यकता असल्यास हितसंबंधांचा संघर्ष किंवा नैतिकता धोरणाचे उल्लंघन होत नसल्याची खातरजमा करण्यासाठी अतिरिक्त माहिती मागवेल.

३. हितसंबंधांचा संघर्ष आणि धोरणाच्या उल्लंघनाचा प्रश्न संबंधित कंत्राटे रद्द करून आणि/ किंवा सुयोग्य शिस्तभंगाची कारवाई करून सोडवला जाईल.

४. चालू वर्षासाठी (२००३) हितसंबंधांचे सर्व संघर्ष आणि धोरणाचे उल्लंघन धोरण/ संहितेचा स्वीकार केल्यानंतर १५ दिवसांच्या कालावधीत कामावरून काढून टाकणे आणि/ किंवा शिस्तभंगाच्या कारवाईने सोडवण्यात येतील.

कर्मचाऱ्याने खालील तपशीलांची नोंद घ्यावीः

- सर्व प्रत्यक्ष/विद्यमान हितसंबंधांचे संघर्ष आणि संहितांचे उल्लंघन कर्मचाऱ्याकडून तात्काळ स्वयंनियमनाच्या प्रक्रियेद्वारे सोडवण्यात येतील ज्यात संबंधित कंत्राटे/ सुविधा तात्काळ काढून घेण्याचा समावेश असेल.
- कोणत्याही कारणामुळे एखाद्या कर्मचाऱ्याला स्वयंनियमनाद्वारे संघर्ष आणि उल्लंघने यांच्यावर उपाय काढणे शक्य न झाल्यास, त्याने किंवा तिने नैतिकता कार्यालयासोबत धोरणाच्या प्रत्येक उल्लंघन आणि संघर्षाबाबत स्पष्टीकरणे मागावीत आणि प्रश्नांवर चर्चा करावी.
- संघर्ष/उल्लंघन आढळल्यावर लगेचच नैतिकता कार्यालयाकडे पूर्ण माहितीसह प्रत्यक्ष किंवा संभाव्य हितसंबंधांचा संघर्ष किंवा धोरणाचे उल्लंघन याची नोंद करण्यात यावी.
- कर्मचाऱ्याने त्याच्या/तिच्या वार्षिक नैतिकता अहवालात संघर्ष/ उल्लंघनाचीही नोंद करावी.
- हितसंबंधांच्या संघर्ष आणि धोरणाच्या उल्लंघनाच्या निर्णयाबाबतच्या विनंत्यांचा विचार प्रकरणानुरूप केला जाईल. विनंतीमध्ये किमान खालील माहितीचा समावेश असला पाहिजेः

- आरइन्फ्राबाबत कर्मचाऱ्याची कर्तव्ये आणि जबाबदार्या  यांचे तपशील
- हितसंबंधांच्या प्रत्यक्ष आणि संभाव्य संघर्षाबाबत, सर्वसाधारण बाबतीत एक तपशील ज्यात कर्मचाऱ्याने केलेल्या प्रस्तावित बाहेरील कृतींचा समावेश आहे. त्यात त्याचे नाव, उत्पादन वर्ग आणि बाहेरील कंपनीची बाजारपेठ किंवा बिझनेस ज्यात कर्मचारी सहभागी होण्याचे प्रस्तावित आहे त्यांचा समावेश आहे.
- बाहेरील कंपनी किंवा आरइन्फ्राच्या उद्योगाशी संबंधित संबंध, असल्यास (उदा. पुरवठादार, ग्राहक, तत्सम उत्पादने किंवा स्पर्धक).
- बाहेरील कंपनी किंवा उद्योग यांच्याशी कर्मचाऱ्याच्या सहभागाची पातळी किंवा प्रस्तावित स्थान (उदा. मालक, कर्मचारी, प्रतिनिधी, सल्लागार, समुपदेशक).
- आचारसंहितेच्या प्रत्यक्ष किंवा संभाव्य उल्लंघनाबाबत इतर कोणतेही तपशील.

परिस्थिती हितसंबंधांच्या संभाव्य संघर्षाबाबत किंवा संहितेच्या उल्लंघनाबाबत गृहित नसल्यास व्यवस्थापनाने कर्मचाऱ्याने आपला निर्णय लेखी स्वरूपात कळवावा. जेव्हा हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष किंवा उल्लंघन अस्तित्वात असल्यास आणि ती अस्वीकाराई असल्याचे मानले गेल्यास नैतिकता कार्यालयाने तात्काळ हे प्रकरण अशा प्रकारची कारवाई घेऊन सोडवावे ज्यात संबंधित कंत्राटे रद्द करण्याचा आणि/ किंवा सुयोग्य शिस्तभंगाच्या कारवाईचा समावेश असेल.

- सदर संहितेनुसार आवश्यक असलेली जी माहिती व्यवस्थापनाकडे प्रकट करण्यात आलेली आहे ती गोपनीय असेल, ज्याला कंपनीच्या हितसंबंधांच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या बाबींचा अपवाद असेल. नैतिकता कार्यालयाच्या निर्णय आणि पाहणी प्रक्रियांना नैसर्गिक न्यायाची तत्वे लागू असतील.

**टप्पा ५: निरंतर समुपदेशन आणि नैतिकता शिक्षण**

आपल्या नैतिकता कार्यक्रमाला सहकार्य करण्याच्या दृष्टीने आरइन्फ्रा एक सर्वांगीण नैतिकता शिक्षण आणि संवाद कार्यक्रम विकसित करेल. हे कार्यक्रम कर्मचार्यांना कामाशी संबंधित माहिती देऊन महत्त्वाच्या नैतिकता प्रश्नांबाबत जाणीव जागृती आणि संवेदनशीलता वाढवण्यासाठी विकसित केले जातील.

कर्मचाऱ्यांनी सर्वप्रथम आपल्या बाजूने पूर्ण काळजी घेण्याचे आवाहन करत असताना निर्णय प्रक्रियेतील नैतिकतेच्या बाबतीत वैयक्तिक संवेदनशीलता आणण्याचे प्रत्यक्ष मार्ग आणण्याच्या काही पद्धती खालीलप्रमाणे आहेतः

सूचना चिन्हे

तुम्ही खालील विधाने करत असता तेव्हा तुम्ही नैतिकतेच्या निसरड्या वाटेवर असाल....

“”कदाचित हे एकदाच करेन ...”

“कोणालाही कधीही कळणार नाही ...”

“जोपर्यंत काम पूर्ण होत आहे तोपर्यंत ते कसे होत आहे याच्याशी काही संबंध नाही.”

“हे मला खरे वाटत नाही.”

“प्रत्येक जण हेच करतो.”

“ते कागदपत्र फाडून टाका.”

“आपण ते लपवू शकतो.”

“कोणाचे नुकसान होणार नाही.”

“त्यात माझ्यासाठी काय आहे?”

“यामुळे स्पर्धा नष्ट होईल.”

“आपण याबाबत कधी बोललोच नाही.”

जर तुम्ही यापैकी कोणतीही विधाने वापरली असल्यास, खालील प्रश्नमंजुषेची उत्तरे द्या आणि तुम्ही नैतिक मूल्यावर मजबूत आहात याची खात्री करा.

प्रश्नमंजुषा– शंका असेल तेव्हा स्वतःला खालील प्रश्न विचारा...

१. माझी कृत्ये कायदेशीर आहेत का?
२. मी न्याय्य आणि प्रामाणिक आहे का?
३. माझी कृत्ये काळाच्या कसोटीवर खरी उतरतील का?
४. मला स्वतःबद्दल नंतर कसे वाटेल?
५. त्याची बातमी छापून आली तर कसे वाटेल?
६. मी आज रात्री शांतपणे झोपू शकेन का?
७. मी मुलांना काय करायला सांगेन?

नैतिक गोंधळ सोडविण्यात मदत करण्यासाठी १२ प्रश्न

१. तुम्ही प्रश्नांची नीट व्याख्या केली आहे का?
२. तुम्ही कुंपणाच्या समोरील बाजूस असल्यास तुम्ही त्या प्रश्नाचा कसा विचार कराल?
३. ही परिस्थिती मुळातच कशी उद्भवली?
४. एक व्यक्ती आणि कंपनीचे सदस्य म्हणून कोणाला आणि कशाला तुम्ही तुमची निष्ठा द्याल?
५. हा निर्णय घेताना तुमचा हेतू काय आहे?
६. या हेतूंची तुलना संभाव्य परिणांसोबत कशी होईल?
७. तुमच्या निर्णय किंवा कृतीमुळे कोणाचे नुकसान होणार आहे?
८. तुम्ही निर्णय घेण्यापूर्वी प्रश्नाची चर्चा संबंधित बाधित पक्षांशी करू शकाल का?
९. तुमचे स्थान तुम्हाला दिसते तेवढ्या दीर्घकालापर्यंत शक्य तितके वैध राहील याचा तुम्हाला विश्वास वाटतो का?
१०. तुमचे बॉस, तुमचे व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळ, तुमचे कुटुंब, एकूणच समाजाला तुमचा निर्णय किंवा कृती यांच्याबाबत माहिती देऊ शकता का?
११. समजून घेतल्यास तुमच्या कृतीचे लाक्षणिक महत्त्व काय आहे? गैरसमज झाल्यास?
१२. कोणत्या परिस्थितीत तुम्ही तुमच्या अपवादांना तुमच्यासमोर येऊ द्याल?

तुम्हाला अजूनही काय करायचे याची खात्री नसल्यास, संबंधित नैतिकता अधिकाऱ्याला विचारा आणि तुम्हाला तुम्ही योग्य गोष्ट करत असल्याची खात्री पटेपर्यंत विचारत राहा.

**प्रश्नावर आधारित समुपदेशन सुविधा**

सदर संहितेअंतर्गत समाविष्ट असलेल्या किंवा नसलेल्या कर्मचाऱ्याला असे वाटले की त्याची कोणतीही कृत्ये किंवा त्याच्या सहकाऱ्यांची, वरिष्ठांची किंवा सोबत काम करणाऱ्यांची कोणतीही कृत्ये, कार्यालयीन किंवा वैयक्तिक पातळीवर सदर संहितेच्या मूलतत्वाला धक्का पोहोचवणारी आहेत तर तो योग्य निरसनासाठी मुख्य नैतिकता अधिकाऱ्याच्या कार्यालयाकडे संपर्क साधू शकतो.

कर्मचाऱ्यांना अतिरिक्त माहिती हवी असेल किंवा त्यांना नैतिकता कार्यालयाशी एखाद्या प्रश्नावर चर्चा करायची असल्यास संपर्काच्या खालील गोपनीय प्रकारांचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. (ई–मेल: ethics@rel.com)

कोणत्याही व्यक्तीने या कार्यालयाशी संपर्क साधल्यास:

- त्यांना प्रतिष्ठेची व आदराची वागणूक दिली जाईल.
- त्यांच्याशी झालेला संवाद शक्य तितका जास्तीत जास्त गुप्त राखण्यात येईल.
- त्यांच्या प्रश्नांवर गांभीर्याने उपाय काढण्यात येईल आणि तुम्ही संपर्क साधाल तेव्हा ते सोडवले गेलेले नसल्यास त्यांना त्याच्या निष्कर्षाची माहिती देण्यात येईल,
- त्यांनी स्वतःची ओळख देण्याची गरज नाही.
- नैतिकता कार्यालयाशी संपर्क साधण्यासाठी कोणताही दंड आकारण्यात येणार नाही.
- अधिकारांवर असलेल्या व्यक्ती कोणालाही नैतिकता कार्यालयाशी संपर्क साधण्यापासून थांबवू शकत नाहीत. त्यांनी प्रयत्न केल्यास त्यांच्यावर योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.